दैनिक

# समर्थ राजयोग

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

SAMARTH RAJYOG

वैभव विवेक स्वामी
सपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ५ वे | अंक -१०१ | मंगळवार,दि.१७ डिसेंबर २०२४ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ | किंमत ३ रू | पाने ४

Beed | Daily Marathi | Year-5th | Issue-101 | Tuesday, Dt.17 December 2024 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

## बीड येथील घटना गंभीर; प्रकरणातील आरोपींवर कडक कारवाई करणार– मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

नागपूर : बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील घटना गंभीर असून यास सरकारने गांभीर्याने घेतले आहे. संबंधीत आरोपी व दोषी पोलीसांवर कारवाई करण्यात आली असून या प्रकरणातील आणखी कोणी दोषी आढळल्यास त्यांच्यावरही कारवाई करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.विधानपरिषद


(उर्वरीत पान २ वर)

# भुजबळांचे मंत्रिपद हुकले, तो आमचा प्रश्न नाही

## सामूहिक उपोषणाची उद्या पत्रकार परिषद घेऊन तारीख सांगणार – मनोज जरांगे

आंतरवाली सराटी - राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांना मंत्रिमंडळातून डावलण्यात आले. भुजबळांना मंत्रिमंडळात स्थान मिळाल्यावरून मनोज जरांगे यांनीही प्रतिक्रिया दिली आहे. छगन भुजबळ यांना मंत्रिमंडळात का घेतले नाही?, हा आमचा प्रश्न नाही. मराठा आरक्षणाच्या मारेकऱ्याचे आम्हाला काही देणे-घेणे नसल्याचे मनोज जरांगे म्हणाले. तसेच उद्या पत्रकार परिषद घेऊन पुढील उपोषणाची तारीख असल्याचेही ते म्हणाले.

देवेंद्र फडणवीसांच्या मंत्रिमंडळाचा रविवार विस्तार झाला. ३३ आमदारांनी कॅबिनेट तर ६ आमदारांनी मंत्रिपदाची शपथ घेतली. परंतु, या मंत्रिमंडळातून छगन भुजबळ यांना डावलण्यात आले आहे. याबाबत भुजबळांनी आपली नाराजी उघडपणे व्यक्त केली. मी एक कार्यकर्ता आहे, त्यामुळे मला घेतले काय आणि फेकले काय?





मंत्रिपद आले गेले पण भुजबळ संपला नाही, अशा शब्दांत छगन भुजबळांनी आपली नाराजी व्यक्त केली. त्यांच्या नाराजीवर मनोज जरांगे यांनी जास्त बोलणे टाळले.

छगन भुजबळ यांना मंत्रिमंडळात का घेतले नाही?, हा आमचा प्रश्न नाही. मराठा आरक्षणाच्या मारेकऱ्याचे आम्हाला काही देणे घेणे नाही. फक्त एवढीय प्रतिक्रिया मनोज जरांगे यांनी दिली. पुढे बोलताना मनोज जरांगे यांनी नागपूरात सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनात मराठा आरक्षणाचा प्रश्न मार्गी काढावा, असे आवाहन सरकारला केले. देवेंद्र फडणवीसांनी बोलल्याप्रमाणे मराठा समाजाला आरक्षण दिले पाहिजे, अशी मागणीही जरांगे यांनी केली.

अनेकदा भुजबळ-जरांगे समोरा-समोर

मराठा आंदोलक मनोज जरांगे गेल्या वर्षभरापासून मराठा समाजाच्या आरक्षणासाठी लढा देत आहेत. यासाठी त्यांनी विविध मोर्चे आणि उपोषणे देखील केली. मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्याची त्यांची विशेष मागणी आहे. दुसरीकडे मराठा समाजाला आरक्षण मिळावं पण ते ओबीसीमधून नको, अशी भूमिका राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळ यांनी घेतली आहे. या मुद्द्यावरून दोघांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरू होते.

### उद्या सांगणार उपोषणाची तारीख

मंत्रिमंडळ विस्ताराच्या दुसऱ्याच दिवशी मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा उपोषणाचा इशारा सरकारला दिला आहे. मंत्र्यांचा शपथविधी झाला, आता उद्या पत्रकार परिषद घेऊन आमरण उपोषणाची तारीख सांगणार, अशी घोषणा मनोज जरांगे यांनी केली. ज्यांना स्वतःच्या मनाने सामूहिक आमरण उपोषणाला बसायचे, त्यांनाच उपोषणाला बसवले जाईल, उपोषणाला बसण्यासाठी कोणावरही बंधन घातले जाणार नसल्याचे मनोज जरांगे म्हणाले. आमरण उपोषणाला कोणी नाही जरी बसले, तरी मी एकटाच बसणार असल्याचा निर्धार जरांगे यांनी केला. मी जर उपोषणाला बसा म्हटले तर घराघरांमधून मराठे उपोषणाला बसतील, अशा इशाराही यावेळी मनोज जरांगे पाटील यांनी सरकारला दिला आहे.

### मनोज जरांगेंनी दिला होता सामूहिक उपोषणाचा इशारा

मनोज जरांगे यांनी राज्यात सरकार स्थापन झाल्यानंतर ८ दिवसांनी आंतरवाली सराटीत सामूहिक उपोषण सुरू करणार असल्याचे सांगितले होते. विधानसभा निवडणुकीत सत्ता कुणाचीही आली तरी आरक्षणासाठी मला लढा द्यावाच लागेल. नवे मंत्री झालेल्यांना ८ दिवस आनंद घेऊ देणार. त्यानंतर उपोषणाची तारीख जाहीर करणार असल्याचेही ते म्हणाले होते. दरम्यान, राज्यात सरकार स्थापन होऊन १० दिवस लोटून गेले आहेत. त्यामुळे मनोज जरांगे सामूहिक उपोषणला बसणार की, हिवाळी अधिवेशनात सरकार मराठा आरक्षणाचा प्रश्न मार्गी लावणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## सोमनाथ सूर्यवंशी यांचा मृत्यू पोलिसांच्या मारहाणीमुळेच!



### शवविच्छेदन अहवालात मृत्यूचे कारण उघड

परभणी ।प्रतिनिधी

परभणी येथे आंबेडकरी आंदोलक सोमनाथ सूर्यवंशी यांचा शव विच्छेदन अहवाल समोर आला आहे. त्यामध्ये त्यांचा मृत्यू पोलिसांच्या मारहाणीमुळेच झाल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यांच्या

(उर्वरीत पान २ वर)

## स्व.संतोष देशमुख हत्याप्रकरणी आ.संदीप क्षीरसागर आक्रमक

### आठवडाभरात योग्य पाऊले न उचलल्यास रस्त्यावर उतरणार







### बांगर कुटुंबियांना संरक्षण देण्याची मागणी

रामकृष्ण बांगर हे बीड जिल्ह्यातील एक संस्थाचालक आहेत. त्यांची संस्था वाल्मीक कराड यांना बळकावयची आहे. त्यामुळे बांगर कुटुंबियांवर गंभीर स्वरूपाचे खोटे गुन्हे दाखल करून दबाव आणण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे बांगर कुटुंबियांना संरक्षण देण्याची मागणीही आ.संदीप क्षीरसागर यांनी केली.

नागपूर ।प्रतिनिधी

मस्साजोग येथील दिवंगत सरपंच स्व.संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरनातील नराधम आरोपी अजूनही मोकाटच आहेत. अतिशय विदारक प्रकरण असताना यातील आरोपी अटक होत नाहीत. प्रशासनाकडून या प्रकरणात दिरंगाई कशाबद्दल होत आहे? असा सवाल उपस्थित करत मस्साजोग प्रकरणी, नागपूर येथे सुरू असलेल्या विधिमंडळ अधिवेशनादरम्यान आ.संदीप क्षीरसागर यांनी आक्रमक होत विधिमंडळ परिसरात आंदोलन केले.

केज तालुक्यातील मस्साजोग येथील दिवंगत सरपंच स्व.संतोष देशमुख यांचे अपहरण करून अतिशय अमानवीय, क्रूर दि.९ डिसेंबर २०२४ रोजी करण्यात आली आहे. अतिशय किरकोळ कारण

(उर्वरीत पान २ वर)

शिवसमर्थ मुळव्याध हॉस्पिटल

अॅडव्हान्स अॅनोरेक्टल (पाईल्स )लेझर सेंटर

डॉ.प्रशांत श.ढाकणे
M.B.B.S. M.D.
(Anaesthesia)
भुलतज्ञ

डॉ.मीरा प्र.ढाकणे
(नागरे)
B.A.M.S. M.S.(Shalya)
मुळव्याध, भगंदर
व लेझर सर्जन

आपल्या बीड शहरामध्ये प्रथमच

महिला मुळव्याध तज्ञ

डॉ.सौ.मीरा प्र.ढाकणे (नागरे)
महिला रूगणांच्या तपासणी करीता उपलब्ध राहतील.

मुळव्याध करीता विशेष उपचार

- लेजर उपचार
- इंजेक्शन उपचार
- ऑपरेशन उपचार
- क्षारसुत्र उपचार
- मुळव्याध, भगंदर
- फिशर
- मलबध्दता
- संडासवाटे रक्तस्त्राव होणे
- बस्ती उपचार
- स्तनातील गाठी
- शरीरावरील सर्व प्रकारच्या गाठी
- स्तनामध्ये पु.होणे
- मोस, जामखीळ व कुरूप काढणे
- गर्भावस्था किंवा प्रसुतीनंतर
- मुळव्याध करीता विशेष आयुर्वेद उपचार

हॉस्पिटलचा पत्ता

शिवसमर्थ मुळव्याध हॉस्पिटल
साई कॉम्प्लेक्स, आदर्श नगर, डी.पी.रोड
बसस्टँण्डच्या पाठीमागे, डॉक्टर लाईन, बीड
मो.क्र.9623079009



संपादकीय

# प्रहसनी पार्लमेंट

राजकीय अभ्यासक, पत्रकार आदी अनेकांस कर्तव्याचा भाग म्हणून या चर्चेची दखल घ्यावी लागली. जगातील सर्वात मोठी लिखित घटना जेव्हा संसदीय चर्चेचा विषय ठरते तेव्हा त्या चर्चेअंती काही किमान भरीव हाती लागावे अशी अपेक्षा रास्त. देशातील बुद्धिमान, प्रकांड समाजाभ्यासक, अनेक पाश्चात्त्य राज्यपद्धतींचे भाष्यकार यांच्यात प्रदीर्घ काळ वाद-संवाद-प्रतिवाद होऊन आकारास आलेल्या संविधान या विषयावर जेव्हा आपले लोकप्रतिनिधी दोन दोन दिवस चर्चा करतात तेव्हा त्याच्या फलिताबद्दल किमान आशा असायला हवी. या चर्चेचा हा हिशेब

तो मांडताना पहिला मुद्दा या चर्चेची गरज हा. काँग्रेसच्या या मागणीचे प्रयोजन काय? गेल्या महिन्यात २६ नोव्हेंबरास संविधानाची पंचाहत्तरी झाली. ते विचारात घेऊन चर्चेची गरज व्यक्त झाली म्हणावे तर तसे नाही. सत्ताधारी घटनेची पायमल्ली करत असल्याचे काँग्रेस म्हणते. वादासाठी तो खरा आहे असे समजा मान्य केले तरी ज्यांच्याकडून पायमल्ली होत आहे त्यांचेच बहुमत असलेल्या संसदेत या कथित पायमल्लीची चर्चा करण्यात काय हशील? ही पायमल्ली खरोखरच होते आहे असे काँग्रेसला वाटत असेल तर शहाणा मार्ग म्हणजे हा विषय लोकांपर्यंत नेणे आणि जनभावना जागृत करणे. ते तर राहुल गांधी लोकसभा निवडणुकांपासून करत आहेत. त्या निवडणुकांत लोकांस हा विषय भावलादेखील. नंतर हरयाणा आणि महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांतही राहुल गांधी यांनी तो मांडून पाहिला. तेथे उलट झाले. जे घटनेची पायमल्ली करतात असे काँग्रेसला वाटते त्यांनाच या निवडणुकांत जनतेने पाठिंबा दिला. लोकशाहीत जनता सार्वभौम. तेव्हा संविधान भान असलेल्या काँग्रेसने जनतेचा तो कौल शिरसावंद्या मानून पुढे जायला हवे. तसे मात्र होताना दिसत नाही. याचा अर्थ संविधानाचा अपमान, पायमल्ली, दुर्लक्ष, घटना पायदळी तुडवणे इत्यादी मार्गांने या विषयास पुढे आणण्याचा प्रयत्न काँग्रेसने सोडणे गरजेचे.

ते शहाणपण काँग्रेस दाखवत नाही. भ्रष्टाचार, संविधान अपमान इत्यादी मुद्दे जोपर्यंत जनतेच्या दैनंदिन जगण्याशी जोडले जात नाहीत तोपर्यंत सर्वसामान्य नागरिकांस त्याविषयावर घातलेल्या हाळ्या आकर्षक वाटत नाहीत. मनोविज्ञानात वर्णिलेला 'ऑब्सेसिव्ह कंपल्सिव्ह डिसॉर्डर' ऊर्फ 'ओसीडी' असा एक विकार अलीकडे अनेकांस होताना दिसतो. अगदी सर्वसाधारण माणसांतही या विकाराची बाधा अलीकडे मोठ्या प्रमाणावर आढळते. या विकाराने बाधित व्यक्ती एकच एक क्रिया सतत करत राहते आणि तरीही ती क्रिया केल्याचे समाधान तीस मिळत नाही. काँग्रेस- त्यातही राहुल गांधी- प्रियंका गांधी- पक्षास या 'ओसीडी'ची बाधा झाली असावी. अशा 'ओसीडी' बाधित व्यक्तीवर मनोविकारतज्ज्ञाकडून उपचार हा मार्ग. काँग्रेसनेही या 'संविधान-ओसीडी' विकारासाठी कोणा राजकीय मार्गदर्शकांचा सल्ला घेण्याची वेळ आलेली आहे. संसदेतील दोन दिवसांच्या चर्चेत त्या पक्षाकडून उपस्थित केलेल्या मुद्द्यांवरून याची जाणीव होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, सावरकर या दोन सरावलेल्या मुद्द्यांत आता मनुस्मृतीची भर इतकाच काय तो बदल ! संघ, सावरकर यांचा भारतीय स्वातंत्र्य आणि संविधान याविषयीचा इतिहास नवीन नाही आणि सावरकरांची 'माफी' ही कशी धूर्तधोरणात्मक 'चलाखी' होती हा हिंदुत्ववाद्यांचा त्यावरील बचावही जुना. तोच पुन्हा या वेळी उगाळला गेला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्याच इतिहासाने त्यास प्रत्युत्तर दिले. संविधान अपमानाचा आरोप करणाऱ्यांकडे ज्या प्रमाणे काही नवीन नाही त्याचप्रमाणे त्या आरोपांचा समाचार घेणाऱ्याकडेही बौद्धिक नावीन्याचा अभाव. काँग्रेसने आणीबाणी लादली, घटना-बदल केले, 'कलम ३५६'चा गैरवापर करून राज्य सरकारे बरखास्त केली इत्यादी विषयांचेही आता गुऱ्हाळातून रस काढल्यानंतर होणाऱ्या उसासारखे चिपाड झालेले आहे. भाजप तीच तीच चिपाडे वारंवार गुऱ्हाळात घालून त्यातून नव्याने रस-निष्पत्ती करण्याचा प्रयत्न करतो. तो काँग्रेसच्या आरोपांसारखाच हास्यास्पद आणि निष्फळ! भाजपचा 'ओसीडी' दुसऱ्या प्रकारचा. काँग्रेसने संविधान पायदळी तुडवले हे कितीही खरे मानले तरी त्यामुळे भाजपचे संविधान-प्रेम त्यातून कसे सिद्ध होते? समोरच्यावर नालायकीचा आरोप केल्यामुळे आपण स्वत: अधिक लायक ठरतो हा भाजपचा समज खरेतर अगदीच बालबुद्धी-निदर्शक. काँग्रेसने आणीबाणी लादली हे खरे. स्वातंत्र्याची गळचेपी केली हे खरे. अनेक यंत्रणा मोडीत काढल्या हे खरे. संविधानास प्रसंगी कस्पटासमान लेखले हे खरे. पण म्हणून भाजपस लोकशाही, व्यक्तिस्वातंत्र्य, सहिष्णुता, सर्वधर्मसमभाव, सर्व सरकारी यंत्रणा याविषयी प्रेम आणि आदर आहे हे खरे कसे? विरोधकांनी इतिहासात केलेली पापे ही सत्ताधाऱ्यांची वर्तमान आणि भविष्यातील पुण्याई असू शकत नाही.

# माझी जात फक्त माणुसकीची व विकासात्मक कामाची -आमदार राजेश पवार

## मतदार संघातील भ्रष्ट अधिकारी व कर्मचाऱ्यांना सोडणार नाही, थेट इशारा

धर्माबाद / अशोक पडोळे

गेल्या पाच वर्षांमध्ये मला कटू अनुभव अधिक आले. भ्रष्ट अधिकाऱ्यांना जात नसते, त्यांची जात फक्त पैसाच असते. पण सर्वसामान्यांच्या जीवाशी खेळून पैसा कमावणाऱ्या माझ्या मतदारसंघातील भ्रष्ट अधिकाऱ्यांना मी कदापी सोडणार नाही मग तो कुठल्याही जातीचा असो, जातीचे राजकारण कर्मचाऱ्यावरून करू नका, त्यांना तो चुकीचा वागत असेल तर समज द्या व एखाद्या कर्मचाऱ्यावर व अधिकाऱ्यावर कुणाच्यातरी सांगण्यावरून अन्याय होत असेल तर थेट माझ्याशी संपर्क करा त्या अधिकाऱ्यावर वा कर्मचाऱ्यावर मी अन्याय होऊ देणार नाही. कठोर निर्णय घेताना मी सत्यता पडताळली आहे पण ही सत्यता पडताळतांना तो कोणत्या जातीचा आहे हे मला माहीत नसते मला सर्वसामान्यांच्या हिताचे निर्णय घ्यावयाचे असतात पण कठोर निर्णय घेतल्यानंतर सर्रास त्याला जातीपातीचे वलय दिल्या जाते. पण मी कुठल्याच जातीला मानत नाही माझी जात फक्त माणुसकीची व विकासाची असून आपण आपल्या मतदारसंघातील विकास माझ्यामार्फत करून घ्यावा असे रोखठोक प्रतिपादन आमदार राजेश पवार यांनी धर्माबाद मध्ये शासकीय विश्रामगृहातील सत्कार समारंभाला उत्तर देताना केले.

राज्यभरात नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत नायगांव विधानसभा मतदारसंघात सलग दुसऱ्यांदा भरघोस मतांनी विजयी झाल्यानंतर शुक्रवारी (१३ डिसेंबर) पहिल्यांदाच धर्माबाद शहरास आ.राजेश पवार यांनी भेट दिली होती. यावेळी शासकीय विश्रामगृहावर कार्यकर्त्यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या सत्कार समारंभात बोलताना, मी केवळ हार,सत्कार मिरवण्यापुरता नसून तर मतदारसंघाचा विकास करण्यासाठी जनतेच्या आशीर्वादाने आमदार झालो आहे अशी प्रांजळ प्रतिक्रिया देत लगेच उपस्थित नागरिकांना आपापल्या गावातील प्रलंबित आणि अत्यावश्यक असलेली कामे सांगावीत असा आग्रह करत,भाषण न करता थेट नागरिकांच्या हातात माईक दिले. पहिल्याच भेटीत भाषण करीत न बसता थेट विकासकामांबाबत चर्चा सुरू केल्याचे पाहून उपस्थित नागरिक चांगलेच प्रभावित झाले होते. विधानसभेच्या निकालानंतर आ.राजेश पवार यांचा कालचा हा पहिलाच दौरा होता, आगमनानंतर कैलास टेकडी येथील गोशाळेत गोमातेचे पूजन व महादेवाचे दर्शन घेतले. त्यानंतर विश्रामगृहावर आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमास



उपस्थिती लावली,यावेळी बूथ प्रमुख,ग्रामीण व शहरी पदाधिकाऱ्यांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर समारोपीय भाषणात त्यांनी नागरिकांशी चर्चा केली आणि येत्या जानेवारी महिन्यापासून विकासकामांचा धडाका सुरू करणार असल्याचे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले. यासोबतच १०० दिवसांचा विकास आराखडा,प्रलंबित फेरफार लवकरात लवकर मार्गी लावण्यात येणार असल्याचे सांगितले. तर येत्या काळात नायगाव मतदारसंघाचा बारामती सारखा विकास करणार असल्याचे सूतोवाच ही त्यांनी यावेळी केले.यावेळी भाजपा कार्यकारणीतील सर्व पदाधिकाऱ्यांसह मित्र पक्षातील सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आ. विजयसिंह पंडित यांचा वर्गमित्रांकडून सत्कार

बीड ।प्रतिनिधी

शहरातील संस्कार विद्यालय येथील तत्कालीन शालेय विद्यार्थ्यांनी स्नेह मिलनाचे आयोजन केले होते. यामध्ये गेवराई विधानसभा मतदारसंघाचे नवनिर्वाचित आ. विजयसिंह पंडित यांचा शालेय वर्ग मित्रांकडून यथोचित सन्मान करण्यात आला.



सन १९९३ च्या दहावीतील विद्यार्थ्यांनी छत्रपती संभाजीनगर येथे स्नेह मिलन कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यामध्ये नवनिर्वाचित आ. विजयसिंह पंडित यांचा सत्कार करण्यात आला. सत्कार प्रसंगी मनोगत व्यक्त करताना आ. विजयसिंह पंडित म्हणाले की, बालपणची मैत्री निखळ, निस्वार्थ असते. त्यामुळे या मैत्रीला प्रचंड महत्त्व असते. आजच्या दगदगीच्या जीवनामध्ये आपण स्वतः कधीतरी लहान व्हावे असे वाटते. आणि त्याचे माध्यम म्हणजे स्नेह मिलन कार्यक्रम होय. प्रत्येक वर्षी स्नेह मिलन कार्यक्रम आयोजित करण्याचा संकल्प आपण सर्वांनी मिळून करायला पाहिजे. माझ्या इतर झालेल्या सत्कारांपैकी बाल मित्रांनी केलेला आजचा सत्कार माझ्या कायम स्मरणात राहणार आहे. असे सांगितले. यावेळी तत्कालीन शालेय विद्यार्थिनी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ड. मोनालिसा जगताप, अपर्णा नवले, ड. ऋषिकेश तुंगार, डॉ. भगवान राख, समीर शेख, योगेश बुरांडे, प्रा. डॉ. अंकुश वाघमारे, संतोष काकडे, संदीप मिश्रा, मुस्ताक बेग यांनी परिश्रम घेतले.

# मुख्याध्यापक पदोन्नतीची माहिती न देणाऱ्या गटशिक्षणाधिकाऱ्यावर कारवाई करा - अनिल जाधवर

बीड ।प्रतिनिधी

जिल्हा परिषद शिक्षण विभागातील मुख्याध्यापकांच्या पदोन्नती करण्याची प्रक्रिया सध्या सुरुआहे . करिता शिक्षण विभाग प्राथमिक ने पदोन्नती पात्र शिक्षकांची यादी अंतिम करण्यासाठी तालुकास्तर पाठवली आहे . तसेच दिनांक ९.१२.२४ पर्यंत तालुकास्तरावरून याबाबत माहिती मागवलेली आहे परंतु अद्यापही बऱ्याचश्या तालुक्यावरून संबंधित सेवा जेष्ठ शिक्षकांची माहिती तसेच अनुषंगाने मागवलेली इतर माहिती अनेक तालुक्यांनी न दिल्यामुळे मुख्याध्यापक पदोन्नती लटकलेली आहे. याला केवळ गटशिक्षणाधिकारी व त्यांचे कार्यालयातील कर्मचारी जबाबदार आहेत .याकरिता शिक्षण विभागाने तालुक्याला स्मरणपत्र सुद्धा पाठवलेले आहे तसेच वेळोवेळी फोनवर सुद्धा संपर्क साधला जात आहे तरीही गटशिक्षणाधिकाऱ्याकडूमाहिती दिली जात नाही तसेच रिक्त पदाचा अहवाल पाठवला जात नाही .ही खेदजनक बाब असुन शिक्षकांना पदोन्नती पासून वंचित ठेवण्याचा प्रकार आहे . त्यामुळे पदोन्नतीपत्र



शिक्षकांमध्ये नाराजी पसरलेली आहे . शिक्षकांना सनदशिर मिळणाऱ्या पदोन्नती पासून वंचित ठेवले जाते . करिता सर्वच गटशिक्षणाधिकाऱ्यांनी मुख्याध्यापक पदोन्नती बाबत माहिती तात्काळ शिक्षणाधिकारी कार्यालयास न दिल्यास माहिती न देणाऱ्या गटशिक्षणाधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी निवेदनाद्वारे कास्ट्राईब जनरल कर्मचारी संघाकडून माननीय मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे करण्यात येणार आहे. या निवेदनावर राज्य अध्यक्ष अनिल जाधवर, कार्याध्यक्ष - रविंद्र सुतार, महासचिव - सुभाष जगताप., उपाध्यक्ष - अभिजित तांदळे, . प्रकाश अहिरे,मच्छिंद्र राख, भगिरथ मस्के, भाऊसाहेब हंगे, अर्जुन बारगजे, कोषाध्यक्ष - बाळासाहेब सिरसाट, विभागीय उपाध्यक्ष - डी एस वाघमारे, बाळासाहेब अहिरे, पद्मनाथ गर्जे जिल्हा अध्यक्ष - द. ल वारे, सचिव - मनियार हकीम, कार्याध्यक्ष - स्वामी ढोकणे, उपाध्यक्ष - प्रविण सानप, कोषाध्यक्ष - संजय दराडे यांच्या स्वाक्षरी आहेत .

# बेभान दिव्यांग मंत्रालयासह आयुक्तालयाच्या विरोधात नागपूर हिवाळी अधिवेशनावर झेंडा मोर्चा

## भानावर या, तुम्ही भानावर या - डॉ जितेंद्र ओव्हाळ

बीड ।प्रतिनिधी

दिव्यांग मंत्रालयाच्या बेजबाबदार धोरणाच्या विरोधात राज्यातील हजारो दिव्यांग शाळा कर्मचारी तसेंच विध्यार्थी बरोबर घेऊन डॉ बाबासाहेब आंबेडकर विकास मंच राज्य अध्यक्ष डॉ जितेंद्र ओव्हाळ यांच्या नेतृवाखाली पहिल्याच दिवशी मोर्चा काढला.

या संदर्भात डॉ जितेंद्र ओव्हाळ यांनी सांगितले की, राज्यात दिव्यांग शाळा दिव्यांग मुलांसाठी चालवल्या जात असल्याचा दिखावा दिव्यांग मंत्रालय त्याच बरोबर दिव्यांग आयुक्त कार्यालय पुणे करत आहे. गेल्या वर्षी हिवाळी अधिवेशनावर आपण टमरेल मोर्चा काढला होता.यात तत्कालीन सचिव महाजन उपसचिव घोडके यांनी मागण्या बाबतीत काहीच केले नाही. आज परिस्थिती मात्र वेगळीच



आहे.विनाअनुदानित दिव्यांग शाळेना अनुदान नाहीं. अनुदानित शाळा कर्मचाऱ्यांना वेतन नाही. थकीत वेतन नाही. मुबलक निधी नाहीं कंत्राटी कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी नाहीं १२३ दिव्यांग शाळेना १००% अनुदान नाही या व दिव्यांग मंत्रालयाची कोणत्याही कामात हस्तेखोरी तसेंच दिव्यांग आयुक्त कार्यालयातील अनागोंधि कारभाराची व घोटाळेबाज अधिकाऱ्याची चौकशी करा या व अनेक मागण्यासाठी नागपूर हिवाळी अधिवेशनावर पहिल्याच दिवशी हजारो कार्यकर्त्यासह विराट झेंडा मोर्चा काडून डॉ बाबासाहेब आंबेडकर विकास मंच अध्यक्ष डॉ जितेंद्र ओव्हाळ यांनी दिव्यांग मंत्रालायचा निषेध केला मागण्या पुर्ण न झाल्यावर मुंबईला मोर्चा काढणार असल्याचा इशारा या मोर्चात डॉ जितेंद्र ओव्हाळ यांनी दिला.

## पान १ वरून...

**बीड येथील घटना गंभीर...**

विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी २८९ अन्वये उपस्थित केलेल्या बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येविषयीच्या प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, या घटनेसाठी 'सीआयडी'ची एक विशेष एसआयटी स्थापन करण्यात आली आहे. तांत्रिक व कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून या प्रकरणाची चौकशी करण्यात येणार असून फरार आरोपींना लवकरच पकडण्यात येईल. या प्रकरणात एका पोलीस अधिकाऱ्यास सक्तीच्या रजेवर पाठविण्यात आले असून एकास निलंबित करण्यात आले आहे. आरोपी कोणत्याही जाती, धर्माचा किंवा राजकीय पक्षाचा असला तरी तसेच कोणत्याही दबावाचा विचार न करता यासंदर्भात कडक कारवाई करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

**स्व.संतोष देशमुख..**

असताना गुन्हेगारी प्रवृत्ती असलेल्या आणि बीड जिल्ह्यांश सत्ताधाऱ्यांचा राजाश्रय असलेल्या नराधमांनी हे कुकर्म केले आहे. स्व.देशमुख यांचे अपहरण झाले तेव्हा त्यांचे लहान बंधू यांनी केज पोलीस स्टेशन ला जाऊन सदरील घटनेची माहिती दिली तरीही तेथील पोलिसांनी वेळ वाया घालवत कुठलीही कारवाई न करता त्यांना तिथे बसवून घेतले. या वेळेत स्व.देशमुख यांचा जीव वाचला असता. पोलिसांनी जाणीवपूर्वक आरोपीना हे कृत्य करण्यासाठी सहकार्य केले होते काय असाही संशय या प्रकरणात येत आहे. स्व.देशमुख यांची हत्या इतक्या हैवानतेने करण्यात आली आहे कि, त्याची कल्पनाही अत्यंत क्लेशदायक आहे. एवढे गंभीर प्रकरण असतानादेखील याप्रकरणातील मुख्य आरोपी अजूनही मोकाट आहेत. त्यामुळे आ.संदीप क्षीरसागर यांनी महाविकास आघाडीतील आमदारांसह विधिमंडळा परिसरात आंदोलन केले.

वाल्मिक कराड यांचे कॉल रेकॉर्ड तपासा

स्व.संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणात वाल्मिक कराड हे मुख्य सूत्रधार असू शकतात. मारेकरी असणारे सर्व आरोपी हे वाल्मिक कराड यांचे निकटवर्तीय आहेत हे स्पष्ट आहे. वाल्मिक कराड यांचे कॉल रेकॉर्ड तपास केवळ माझी एकट्याची नसून एकंदरीत देशमुख कुटुंबीय, सर्व मस्साजोग गाववासीय आणि जिल्ह्यातील अनेक लोकप्रतिनिधी यांची आहे त्यामुळे एकदा वाल्मिक कराड यांचे कॉल रेकॉर्ड तपासले तर सत्य पुराव्यासह बाहेर येईल असेही आ.संदीप क्षीरसागर यांनी यावेळी म्हटले.

**सोमनाथ सूर्यवंशी..**

संपूर्ण शरीरावर मारहाणीच्या खुणा स्पष्टपणे दिसत असल्याचे अहवालात म्हटले आहे. संविधानाची विटंबना झाल्याने परभणी शहरात आंबेडकरी जनतेने निषेध आंदोलन केले. यामध्ये पोलिसांनी बळाचा वापर करत आंदोलकांवर लाठीचार्ज केला. अनेक निरपराध तरुणांवर गुन्हे दाखल करून त्यांना अटक केली. यामध्ये सूर्यवंशी यांचा समावेश होता. त्यांचा रविवारी (दि.१५) पोलिसांच्या मारहाणीत मृत्यू झाला. या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ड. प्रकाश आंबेडकर परभणी शहरात दाखल झाले आहेत. ड. प्रकाश आंबेडकर यांनी सूर्यवंशी यांचा पोस्टमार्टम ऑन कॅमेरा करावा अशी मागणी केली होती. तसेच सूर्यवंशी यांना आम्ही न्याय मिळवून देऊ. त्यांच्या न्यायासाठी लढा देणार असल्याचेही ड. आंबेडकर यांनी म्हटले आहे.

## वारस प्रमाणपत्रा बददल जाहीर घोषणा

**श्री. आर. आर. जाधव ४ थे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, गेवराई गेवराई, जि. बीड यांचे न्यायालयात**

**दिवाणी किरकोळ अर्ज क. ९४१ / २०२४ भिमा व इतर ०२ वि. निरंक**

**(मार्फत ॲड बी. के. निकाळजे, गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे अमोल भिमराव थोरात, मौज रा. पाचेगांव, ता. गेवराई, जि. बीड. हे दिनांक २२/१०/२०२४ रोजी मौजे पाचेगांव, ता. गेवराई, जि. बीड. येथे मयत झाले.

अर्जदार :- ०१. भिमा पि. आश्रुबा थोरात, वय ५२, धंदा मंजुरी, रा. पाचेगांव, ता. गेवराई, जि. बीड.

०२. वैजंता भ्र. भिमा थोरात, वय ४७, धंदा घरकाम, रा. सदर.

०३.सुदर्शन पि. भिमा थोरात, वय ३०, धंदा मजुरी, रा. सदर

ज्याअर्थी अर्जदार यांना शासकिय व निमशासकिय कामासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसांचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुण असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत अमोल भिमराव थोरात, मौज रा. पाचेगांव, ता. गेवराई, जि. बीड. यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनाक ११/१२/२०२४ माझया सही व शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख १६/०१/२०२४

| स्वाक्षरित | आदेशावरून |
|---|---|
| क.लिपीक | सहायक अधिक्षक |
| | दिवाणी न्यायालय क. स्तर, गेवराई ता. गेवराई, जि. बीड |

## जाहिर प्रगटन

**मा. श्री. व्ही. सी. जोशी १ ले दिवाणी न्यायाधीश क. स्तर बीड ता. जि. बीड यांचे न्यायालयात किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १५८०/२०२४ ड. गडकर एम. ए. यांच्या मार्फत**

**मिराबाई हनुमान धायगुडे वि. निरंक**

**ज्यापेक्षा हनुमंत उर्फ हनुमान पि. मोहनराव धायगुडे, हे दिनांक २९.१२.२०२३ रोजी पाटेगाव ता. कर्जत जि. अहमदनगर येथे मयत झालेले आहेत. आणि तसेच अर्जदार**

१.मिराबाई भ्र. हनुमान धायगुडे, वय - ७२ वर्षे, धंदा :- घरकाम / शेती, ग. हनुमान मंदीरा जवळ, काळा हनुमान ठाणा बीड ता. जि. बीड.

२.आकाश पि हनुमान धायगुडे, वय - ३३ वर्षे, धंदा :-मजुरी, रा. वरीलप्रमाणे.

३.अरूण पि. हनुमान धायगुडे, वय - ३० वर्षे, धंदा :मजुरी, ग. वरीलप्रमाणे.

४.सुरेखा भ्र. सोनाजी मदने, वय- २८ वर्षे, धंदा :- घरकाम, रा. काजळा ता. बदनापुर जि. जालना.

अर्जदार क १ ही मयत नामे हनुमंत उर्फ हनुमान पि. मोहनराव धायगुडे, यांची पत्नी असून, अर्जदार कं २ व ३ हे मयताचे मुले तर अर्जदार कं ४ ही मयताची विवाहीत मुलगी आहे. मयताचे आई वडील यापुर्वीच मयत झालेले आहेत. या अर्जदारा व्यतीरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत. असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरून असे या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहू अर्जदारांच्या हक्काबददल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना / अर्जदारांना सदरहू मयत हनुमंत उर्फ हनुमान पि. मोहनराव धायगुडे, यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख १८ / ०१ / २०२५ आहे.

आज दिनांक १३ डिसेंबर २०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.

| स्वाक्षरित | आदेशावरून |
|---|---|
| क.लिपीक | अधीक्षक |
| दिवाणी न्यायालय, क.स्तर,बीड | दिवाणी न्यायालय, क.स्तर,बीड |

# स्कुटीला ट्रकची धडक; एक ठार एक जखमी

## गेवराई बायपास वरील दुर्घटन

गेवराई ।प्रतिनिधी

बेलगाव वरून गेवराईकडे आपल्या स्कुटीवर हायवे वरून येणाऱ्या येथील किराणा व्यापारी रमेश चत्रभुज बंग हे डबल सीट येत असताना अज्ञात ट्रकने मागून जोरदार धडक दिल्याने रमेश बंग हे ट्रक खाली सापडून जागीच मरण पावले तर गोपाल भुतडा हा युवक किरकोळ जखमी झाला आहे . ही घटना गेवराई शहरापासून सहा किलोमीटर असलेल्या नायरा पेट्रोल पंपासमोर हायवेवर घडली . दिनांक १५ डिसेंबर २०२४ रोजी सायंकाळी सहाच्या सुमारास हा अपघात गेवराई बायपासवर घडला . मयत रमेश चत्रभुज बंग हे ५९ वर्षे वयाचे असून त्यांचे गेवराई येथील बाजार तळावरील पोलीस स्टेशन रोडवर कपिल किराणा नावाचे दुकान आहे .गेवराई येथील महेश कॉलनी येथे ते पत्नीसह राहत होते .त्यांची दोन विवाहित मुले पुणे या ठिकाणी राहतात . रमेश बंग यांची बेलगाव शिवारामध्ये शेती असून या शेतीला चक्कर मारून आपली एमएच बीए ९०७६ या लाल रंगाच्या स्कुटीवर उसाची मोळी घेऊन गेवराईकडे येत असताना साडेपाच ते सहाच्या दरम्यान अज्ञात भरदार ट्रकने स्कुटीला धडक दिल्याने रमेश बंग हे ट्रकखाली आले आणि डोक्याचा चैदामेंदा झाल्याने ते जागीच ठार झाले तर त्यांच्यासोबत असलेले गोपाल भुतडा हे किरकोळ जखमी झाले आहेत . याबाबत अधिक माहिती मिळू शकली नाही सायंकाळी उशीर अपघात झाल्याने गेवराई येथील उपजिल्हा रुग्णालयात मयतास शवागृहात ठेवण्यात आले आहे . त्यांच्यावर अद्याप शवविच्छेदन झाले नाही .अधिक माहिती पोलिसांकडून मिळू शकली नाही .सदर व्यापारी हे मनमिळावू आणि हसतमुख असल्याने गेवराई शहरात व्यापारी मंडळात आणि मित्र परिवारामध्ये शोककळा निर्माण झाली आहे . दि . १६ रोजी त्यांच्या पार्थिवावर गेवराई येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत .



# गेवराईच्या युवा नेत्याच्या वाहनावर अज्ञाताचा गोळीबार

## शहागड हायवेवर पैठण फाट्यावरील गंभीर घटना

गेवराई ।प्रतिनिधी

तालुक्यातील एक युवा राजकीय नेता आणि सामाजिक कार्यकर्ता आपल्या वाहनातून गेवराई - छत्रपती संभाजीनगर महामार्गावरून जात असताना रात्री १०.३० च्या सुमारास अज्ञात इसमाने गाडीच्या दिशेने गोळीबार केल्याने गाडीच्या ड्रायव्हरला गोळी लागून गाडीचा ताबा सुटून गाडीने चार-पाच पलट्या मारल्या . त्यामुळे गाडीचा ड्रायव्हर हा गंभीर जखमी झाला आहे . त्यास छत्रपती संभाजीनगर येथील सिगा रुग्णालयात प्रथमोपचार करून पुढील उपचारासाठी पुणे येथे हलविण्यात आले आहे . दरम्यान गाडीमालक बी. एम. मस्के यांना गोंदी पोलिसांनी चौकशीसाठी बोलावले असल्याचे सूत्रांनी सांगितले . याबाबतची सूत्राने दिलेली सविस्तर माहिती अशी की, गेवराईतील पूर्वाश्रमीचे बी. आर. एस .पक्षाचे अध्यक्ष आणि गेवराई तालुक्यातील रेवकी गावच्या सरपंचाचे पुत्र सामाजिक कार्यकर्ते, युवा नेते



बाळासाहेब उर्फ बी . एम . मस्के हे आपल्या एम . एच . १२ टी डी ००९९ या ग्लोस्टार वाहनातून दिनांक १४ डिसेंबर रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास गेवराई - छत्रपती संभाजीनगरकडे जात असताना शहागडच्या पुढे असलेल्या पैठण फाट्यावर हायवेला अज्ञात इसमाने बी .एम . मस्के यांच्या वाहनाच्या दिशेने पिस्तुलातून गोळी झाडल्याने ती गोळी ड्रायव्हर कबीर प्रकाश सोनवणे (रा. जायकवाडी वसाहत, बाग पिंपळगाव ता . गेवराई )यांच्या पोटात घुसल्याने त्यांचा गाडीवरील ताबा सुटला आणि गाडी हायवेवर दोन-चार पलट्या खाऊन झाडाला धडकली . त्यामुळे गाडीचे बलून ओपन होऊन बी .एम .मस्के हे बालंबाल बचावले . त्यांना कुठलीही गंभीर इजा झाली नाही .मात्र ड्रायव्हर कबीर सोनवणे हा गंभीर जखमी झाला . गाडी पूर्णपणे डॅमेज झाली असून ड्रायव्हरला प्रथमतः घाटी रुग्णालयात आणि नंतर सिग्मा हॉस्पिटलमध्ये उपचारार्थ दाखल करण्यात आले होते . परंतु त्यांची प्रकृती अत्यवस्थ झाल्याने त्यांना पुणे येथील हॉस्पिटलमध्ये उपचारार्थ हलविण्यात आले . याबाबत गोंदी पोलीस स्टेशनला संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता संपर्क झाला नाही . त्यामुळे अधिक माहिती मिळू शकली नाही . अशी घटना घडलीच कशी असे तर्कवितर्क गेवराई शहरात काढले जात आहेत . गोळी नेमकी कुणी झाडली हे मात्र समजू शकले नाही .

# महायुतीचे 8 मंत्री झाले माजी

## भुजबळ, मुनगंटीवार, केसरकरांसह यांचा पत्ता कट

नागपूरमध्ये भाजप महायुतीच्या नव्या सरकारच्या मंत्रिमंडळाचा विस्तार झाला. नव्या सरकारच्या शपथविधीनंतर तब्बल तीन आठवड्यानंतर मंत्रिमंडळ विस्ताराला मुहूर्त मिळाला. हिवाळी अधिवेशनाआधी झालेल्या या शपथविधी सोहळ्यात ३९ मंत्र्यांना शपथ देण्यात आलीय.यात ३३ कॅबिनेट मंत्री तर ६ राज्य मंत्र्यांचा समावेश आहे. भाजपच्या १९, शिवसेनेच्या ११ आणि राष्ट्रवादीच्या ९ मंत्र्यांनी शपथ घेतली. नव्या सरकारमध्ये महायुतीने नव्या चेहऱ्यांना संधी दिलीय. तर काही जुन्या आणि ज्येष्ठ नेत्यांना डावलण्यात आलंय. यात भाजपच्या दोन, शिवसेनेच्या ३ तर अजित पवार गटाच्या दोन मंत्र्यांना डच्चू देण्यात आला आहे. भाजपने माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार, रविंद्र चव्हाण आणि विजयकुमार गावित यांना नव्या मंत्रिमंडळातून वगळलं आहे. यात रविंद्र चव्हाण यांना भाजपकडून महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदाची जबाबदारी दिली जाणार असल्याची चर्चा आहे.शिवसेना शिंदे गटाकडून आधीच्या सरकारमधील तिघांना डच्चू देण्यात आला. यात आरोग्यमंत्री तानाजी सावंत, अब्दुल सत्तार आणि दीपक केसरकर यांचा समावेश आहे. यामुळे तिघेही नाराज असल्याचं म्हटलं जातंय. त्यांच्या जागी नव्या चेहऱ्यांना शिवसेनेनं संधी दिली आहे.राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाने दिग्गज नेत्यांना मंत्रिमंडळातून वगळलं आहे. छगन भुजबळ आणि दिलीप वळसे पाटील यांना मंत्रिमंडळात स्थान देण्यात आलेलं नाही. यामुळे भुजबळ समर्थक नाराज झाले आहेत. भुजबळ समर्थकांनी नाराजी व्यक्त करत सरकारला इशारासुद्धा दिला आहे. दिलीप वळसे पाटील हे लोकसभा निवडणुकीत सक्रीय नव्हते. त्यांनी महायुतीच्या उमेदवारासाठी प्रचारही केला नव्हता. यामुळे त्यांना कॅबिनेटमधून मंत्रिमंडळातून हटवण्यात आलं आहे.छगन भुजबळ हे ओबीसी नेते असून मराठ्यांना ओबीसीमधून आरक्षणाला त्यांनी थेट विरोध केला होता. यामुळे राज्यात मनोज जरांगे पाटील विरुद्ध छगन भुजबळ असा वादही निर्माण झाला होता. मराठा समाजाची नाराजी ओढावली जाऊ नये यामुळे भुजबळांना डावललं असल्याची चर्चा आहे.



# लोकनेत्या मा.पंकजा गोपीनाथ मुंडे यांची कॅबिनेट मंत्री निवड झाल्याने भाजपा जिल्हा कार्यालयात आनंद उत्सव साजरा




बीड ।प्रतिनिधी

आज नागपूर येथे झाल्याल्य महायुती शपथविधी कार्यक्रम मध्ये पंकजाताई मुंडे यांनी कॅबिनेट मंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर बीड जिल्हा भाजप कार्यलय येथे मोठया प्रमाणात आनंद उत्सव साजरा करण्यात आला. या वेळी भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ अण्णा शिराळे, दलित मोर्चा जिल्हा अध्यक्ष अजय सवाई, शिवाजी अप्पा मुंडे, संगीताताई धसे, गणेश पुजारी, संदीप उबाळे, भूषण पवार, बंटी फड, हरीश खाडे, अमोल वाढतिले, कपिल सौदा,केशव बडे,राजू शहाणे, अनंत नागरगोजे, दत्त भाऊ थिगळे बाबुराव परळकर अनिल शेटे

# आंदोलनकर्ते यांना जिल्हाधिकारी, तहसिल कार्यालयाच्या आवारात

## निवारा शेड , पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहांची व्यवस्था करा :- डॉ.गणेश ढवळे

बीड ।प्रतिनिधी

बीड शहरातील शासकीय कार्यालये उदाहरणार्थ जिल्हाधिकारी कार्यालय आणि तहसिल कार्यालयाच्या नविन इमारतीच्या नियोजित आराखड्यात आंदोलनकर्ते यांना बसण्यासाठी जागा, निवारा शेड,पिण्याचे शुद्ध पाणी व स्वच्छतागृहाची सोय करण्यात यावी आणि बीड शहरातील बीड ते नगर रोड राष्ट्रीय महामार्गावरील रूंदीकरण दरम्यान नालीच्या कामासाठी शासकीय कार्यालयासमोरील संरक्षक भिंती आणि नगरपालिकेने बांधलेली स्वच्छतागृहे तोडण्यात आली त्यामुळे शासकीय कार्यालयात येणा-या नागरीकांची गैरसोय होत असुन नालीचे बांधकाम पूर्ण झालेल्या ठिकाणी तातडीने संरक्षक भिंत आणि स्वच्छतागृहे बांधण्यात यावीत.अथवा लोकवर्गणीतून आंदोलनकर्त्यांना निवारा शेड बांधण्याची रितसर परवानगी देण्यात यावी अशी

मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर , माहिती आधिकार कार्यकर्ते शेख युनुस, शेख मुबीन,शेख मुस्ताक यांनी शिवकुमार स्वामी निवासी उपजिल्हाधिकारी बीड यांना लेखी निवेदनाद्वारे करत प्रजासत्ताक दिनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलनाचा ईशारा दिला आहे.बीड शहरातील नगररोड वरील जिल्हाधिकारी, तहसिल, पंचायत समिती, सामाजिक न्याय भवन शासकीय कार्यालये याठिकाणी आंदोलनकर्ते यांना निवारा असणारी मोठमोठाली झाडे जिल्हा प्रशासनामार्फत तोडण्यात आली असुन आंदोलनकर्ते यांचा निवारा हिरावला गेला आहे.तसेच नवनिर्माण जिल्हाधिकारी व तहसील कार्यालय आवारात आंदोलनकर्ते यांच्यासाठी नियोजित जागा, निवारा शेड, पिण्याचे पाणी व स्वच्छतागृहाची सोय उपलब्ध करण्यात यावी.



बीड शहरातुन जाणा-या बीड ते नगर रोड राष्ट्रीय महामार्गाचे रुंदीकरण दरम्यान नाली बांधकामासाठी बीड शहरातील न्यायालय, तहसिल, पंचायत समिती, सार्वजनिक बांधकाम, पोलिस मुख्यालय आदि शासकीय कार्यालया समोरील नगरपरिषदेने बांधलेली स्वच्छतागृहे तोडण्यात आली असुन शासकीय कार्यालयात कामकाजासाठी येणाऱ्या नागरीकांची गैरसोय होत असुन नाली बांधकाम झालेल्या ठिकाणी तातडीने स्वच्छतागृहे बांधण्यात यावीत.

# पोलिसांच्या मारहाणीमुळेच सोमनाथ सूर्यवंशीचा मृत्यू

## सुषमा अंधारे यांचा आरोप; परभणीत आजारी माणसांनाही अटक केल्याचा दावा

मुंबई /वृत्तसंस्था

परभणी येथे घडलेल्या हिंसाचारानंतर पोलिसांनी अनेकांना अटक केली. यात सोमनाथ सूर्यवंशी नामक एका आंबेडकरी अनुयायाला सुद्धा अटक करण्यात आली होती. न्यायालयीन कोठडीत असताना सोमनाथ सूर्यवंशी यांना हृदयविकाराचा झटका आला आणि त्यांचा मृत्यू झाल्याचा पोलिसांनी दावा केला होता. या घटनेच्या निषेधार्थ आंबेडकरी अनुयायांनी महाराष्ट्र बंदची हाक दिली आहे. या घटनेवर शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

सुषमा अंधारे म्हणाल्या, संजय वाकोडे हा पँथरचा माणूस. या माणसाला इतक्या शारीरिक व्याधी आहेत की हा जागचा हालू शकत नाही. विजय वाकोडे सध्या शुगर आणि अनेक आजारांनी त्रस्त आहेत. जुना जाणता पँथरचा माणूस आहे आणि हा माणूस रस्त्यावर येऊन तोडफोड करूच शकत नाही. अशा माणसाला मध्ये घेता तुम्ही? असा सवाल सुषमा अंधारे यांनी उपस्थित केला आहे.

पुढे बोलताना सुषमा अंधारे म्हणाल्या, रवी सोनकांबळे नगरसेवक राहिलेला माणूस. अत्यंत समंजस, परभणीमध्ये शांतता राहावी म्हणून अनेकवेळा शांतता कमिटीवर काम केलेला हा माणूस. सुधीर साळवे, साई नरवडे, महादेव ननावरे, किशोर बोराडे, सतिश भालेराव, आत्माराम राऊत, विशाल जंगले, सुरज खिल्लारे, रमेश मोरे, अशी अनेक नावे सुषमा अंधारे यांनी यावेळी घेतली. एका एका कुटुंबातील सर्वच सदस्य म्हणजे जामीन घ्यायला कोणीच शिल्लक नाही राहिले पाहिजे, अशा सर्व लोकांना अटक केल्याचा आरोप सुषमा अंधारे यांनी केला आहे.सुषमा अंधारे म्हणाल्या, सोमनाथ सूर्यवंशी हा लॉच्या तिसऱ्या वर्षाचा विद्यार्थी जो फक्त आणि फक्त व्हिडिओ रेकॉर्ड करत होता, याला इतकी बेदम मारहाण केली गेली की याची मारहाण अक्षरशः जणू याच्यावर एखाद्या धारदार शस्त्राने वार केले आहेत. अशा पद्धतीची मारहाण जर तुम्ही सोमनाथ सूर्यवंशीला करत असाल आणि त्यानंतर त्याचा बळी जात असेल भलेही तो एमसीआरमध्ये मेला

# धारुर तालुक्यातील फकिर जवळा येथील ग्रामस्थांच्या वतीने सत्कार

## शेतकऱ्याच्या मुलाची केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बलात निवड

दिंद्रुड - परिसरातील फकीर जवळा येथील शेतकरी कुटुंबातील दत्ता साबळे या तरुणाची केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलात नुकतीच निवड झाली. घरच्या हालाखीच्या परिस्थितीवर मात करत या तरुणाने मिळवलेले हे यश जवळा (ता.धारुर) ग्रामस्थांसाठी अभिमानास्पद असल्याने त्यांनी दत्ताचा काल रविवारी (१५ डिसेंबर) रोज सकाळी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत यथोचित सन्मान केला. भूमिपुत्राच्या या यशाचे गावकऱ्यांनी सद्गतीत कंठाने कौतुक केले.

भारताच्या केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाचा भाग असलेल्या केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाचा नुकताच एसएससी जीडी या परिक्षेचा अंतिम निकाल कालच्या १३ डिसेंबर रोजी जाहीर करण्यात आला. या निवड यादीत दत्ता साबळे या युवकाचे नाव झळकताच जवळा गावात आनंद व्यक्त करण्यात आला. दत्ताचे वडील तुकाराम साबळे शेतकरी तर आई गवळणबाई गृहिणी आहेत. लहान बहिण,भाऊ व त्याच्या शालेय शिक्षणाचा भार अतिशय हलाखीच्या परिस्थितीत आई-वडिलांनी पेलला. दत्ताने मिळवलेल्या या यशामुळे आई-वडिलांच्या कष्टाचे चीज झाले असून त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# तबल्याचा ताल हरपला

## झाकीर हुसेन यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची श्रद्धांजली

नागपूर : प्रसिद्ध तबलावादक उस्ताद झाकीर हुसेन यांच्या निधनाने तबल्याचा ताल हरपला आहे. तबल्याच्या नादमाधुर्याने सबंध जगातील रसिक श्रोत्यांना एका समेवर आणणारा महान सुपुत्र आपण गमावला आहे, अशा शोकसंवेदना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केल्या.महाराष्ट्राचा सुपुत्र असलेल्या झाकीर हुसेन यांनी अवघ्या जगाला तबल्याचे वेड लावले. तीन पिढ्यांसोबत तबल्याची जुगलबंदी सादर करणारे झाकीर हुसेन यांनी अनेक युवकांना तबला वादनाकडे आकर्षित केले. तबला क्षेत्रात भारताची वेगळी ओळख त्यांनी जगात निर्माण केली. तबलानवाज पद्मविभूषण उस्ताद झाकिर हुसेन आणि तबला हे अद्वैत होते. हे अद्वैत आता भंगले आहे. जादुई बोटांनी त्यांनी स्वरमंडलात उभे केलेल्या अनेक अद्भुत मैफिली यापुढे तालयोगी तबलानवाझ उस्ताद झाकिर हुसेन यांच्याविना सुन्यासुन्या वाटत राहतील. वयाच्या सातव्या वर्षापासून तबलावादनाची सुरुवात करणाऱ्या उस्ताद झाकिर हुसेन यांनी तबलावादनातील एकल मैफिलींनाही प्रतिष्ठा मिळवून दिली. भारतीय संगीताला जागतिक पातळीवर सन्मान मिळवून देण्यात हुसेन यांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांचे शिष्य जगभर संगीताची सेवा करत आहेत. वडिलांकडून मिळालेला संगीताचा वारसा त्यांनी केवळ जोपासलाच नाही तर तबलावादनाला अत्युच्च अशा शिखरावर नेले. गाणारा तबला ही त्यांच्या जादुई बोटांची करामत अनेकांनी अनुभवली आहे. ज्येष्ठ कलाकारांबरोबर केलेली जुगलबंदी रसिकांसाठी पर्वणी होती. तरूण आणि होतकरू कलाकारांना व्यासपीठ मिळावे, त्यांची कला सादर व्हावी, यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. तबल्याला समानार्थी नाव झाकीर हुसेन होते. साथीच्या या वाद्याला त्यांनी व्यासपीठाच्या केंद्रस्थानी आणून त्याला जनमनात स्थान मिळवून देण्याचे महान कार्य केले. त्यांच्या निधनाने भारतीय संगीताचा तेजस्वी तारा निखळला आहे. मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. त्यांच्या कुटुंबियांच्या आणि चाहत्यांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या शोकसंदेशात म्हटले आहे.

# तालिका सभापतींच्या नावांची घोषणा

नागपूर ।प्रतिनिधी
विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी विधानपरिषदेच्या तालिका सभापतीपदी नियुक्त नावे जाहीर केली. तालिका सभापती पदी सर्वश्री निरंजन डावखरे, शिवाजीराव गर्जे, कृपाल तुमाने, सुनील शिंदे, धीरज लिंगाडे यांच्या नावाची घोषणा श्रीमती गोऱ्हे यांनी केली. विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी विधानपरिषदेच्या तालिका सभापतीपदी नियुक्त नावे जाहीर केली.


लातूर -विधानसभा निवडणुकीनंतर नवीन सरकारच्या कार्यकाळातील महाराष्ट्र विधिमंडळाचे पहिले अधिवेशन सोमवार दि. १६ डिंसेबर २४ पासून नागपूर येथे सुरू झाले.या अधिवेशनाच्या पहिल्या दिवसाच्या कामकाजात सहभागी होण्यासाठी विधान भवन सभागृहात जातांना राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख.

# मुंडे साहेबांच्या जयंती निमित्त मानूरच्या सरपंचांकडून रुग्णवाहिकेचे लोकार्पण

मानूर ।प्रतिनिधी
बारा डिसेंबर या दिनी महाराष्ट्राचे लाडके दैवत आणि लोकनेते स्व. गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांचा ७५वा जयंती सोहळा मानूरचे लोकप्रिय लोकनियुक्त सरपंच श्री अशोक (मामा) पाखरे यांनी मोठ्या दिमाखात साजरा करताना स्व. लोकनेते मुंडे साहेब यांच्या सामाजिक विचारांचा वारसा पुढे नेत गावात विविध उपक्रम साजरा करतानाच तालुक्यातील गरजू लोकांसाठी मोफत रुग्ण वाहिकेचे लोकार्पण केले. शिरूर तालुका व मानूर गाव व पंचक्रोशीतील ज्या ज्या गरजू लोकांना ऐनवेळी रुग्ण मोठ्या हॉस्पिटलला दाखल करण्यात अडचणी

येत होत्या त्याला अनुसरून आणि सामाजिक बांधिलकी जपत सरपंच अशोक मामा पाखरे यांनी अत्याधुनिक रुग्ण वाहिका गावाला समर्पित करून रुग्ण सेवा हीच खरी ईश्वर सेवा असे म्हणून खऱ्या खुऱ्या समाज सेवेचा आदर्श जनतेला दिला.स्व. लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या जयंती निमित्त जाटवड मानूर येथील गोपीनाथ गडावर जो की, सरपंच अशोक मामा पाखरे यांनी स्वतः उभारलेला आहे त्या ठिकाणी गड सुशोभीकरनासाठी ७५ वृक्षाचे वृक्षरोपण करून गडाला एक आगळे वेगळे रूप दिले गेले. तसेच गोपीनाथ गडावर संध्याकाळी कीर्तन सेवा संपन्न झाली त्यावेळी मोठ्या संख्येने जनसमुदाय उपस्थित होता या अलौकिक कार्याबद्दल उपस्थित असलेला सर्व जनसमुदाय आंनदीत झाला. आणि लोकनेत्याचा कार्यकर्ता असावा तर असाच यावर शिक्का मोर्तब झाले.



# अमेरिकेची नवरी शिरूरच्या कालिकादेवीला ! घराण्याची परंपरा आणि संस्कृतीचा वारसा !

मानूर ।प्रतिनिधी
शिरूर कासार येथील जाज्वल्य दैवत आणि कासार समाजाचे कुलदैवत असलेल्या कालिका देवीचा कुलाचार व पारंपारिक परंपरा व संस्कृती म्हणून आजही पाळली जाते ,कालपरत्वे शैक्षणीक , सामाजीक आणि अर्थिक परिस्थितीत अनेक बदल घडत असले तरी श्रध्देपोटी आपली परंपरा व संस्कृती म्हणून जतन केली जात आहेत ,शैक्षणीक भरारी घेऊन थेट अमेरिकेत गेलेली मुलगी लग्नबंधनात अडकली जात असल्याने आपल्या कुलस्वामिनीचा अशिर्वाद घेण्याची विसरत नाही ,दोन दिवसापुर्वी नवरी मुलगी आपल्या आईवडीलासह भाऊ भावजय यांना बरोबर घेऊन देवीचे दर्शन घेऊन वैवाहीक जिवनासाठी अशिर्वाद घेतले .

येथील रहिवासी मात्र किमान साठ वर्षापुर्वी आजोबा परशुराम बळीराम दगडे यांनी नोकरी निमित्ताने शिरूर सोडले ,तिकडे वंशवेल वाढला शिक्षण घेऊन मुल नोकरीला लागले त्यांची लग्न झाली आणि नातवाच्या गोतावळ्यात हे कुटूंब रमले ,पैकी सुरेंद्र दगडे हा मुलगा डॉक्टर झाला सुनबाई देखील डॉक्टरच मिळाली या जोडप्याला अजिंक्य मुलगा व सायली मुलगी यांनी शिक्षणात भरारी घेतली ,पांच वर्षापुर्वी सायली अमेरिकेत शिक्षणासाठी गेली आणि तिथेच नोकरीला लागली तसा जोडीदार देखील अमेरिकेतच भारतीय वंशाचा मिळाला रितीरिवाजाने सर्व प्राथमिक प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर लग्नतिथी निश्चित झाली .लग्न म्हटले की देवीच्या सवासनी हा कुलाचार परंपरेचे बंधन म्हणून ही अमेरिकेन नवरी आपल्या मातापित्यासह शिरूरला कालिका देवीच्या दर्शनासाठी येऊन घराण्याची परंपरा व संस्कृती सांभाळली .अमेरिका आणि आपले हवामानात विरोधाभास असला तरी श्रध्देला पर्याय न ठेवता अगदी आनवानी पायांनी मंदिरापर्यंत गेली अगदी साष्टांग दंडवत देखील घातला .

मी अमेरिकेत गेली असली तरी माझ्या मायभुमिची संस्कृती ही कदापी विसरणे शक्य नाही ,माणुस कितीही मोठा झाला ,पैशाने श्रीमंत झाला तरी भारतीय संस्कृती ही त्याहून वैभवसंपन्न असल्याने वर्षातुन एकवेळ तरी आम्ही दोघे देवीच्या दर्शनाला येणारच असल्याचे सायली दगडे या अमेरिकन नवरीने सांगितले.



# लवाद नामतालिकेसाठी अर्ज करण्याचे आवाहन


बीड ।प्रतिनिधी
बहूराज्यीय सहकारी संस्था अधिनियम,२००२ चे कलम ८४ (४) अन्वये सन २०२५-२०२८ या कालावधीसाठी लवाद नामतालिका (-ीलळींीीं झरपलश्र) तयार करण्यासाठी खालील व्यक्तिंकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. सर्व न्यायालयात निवृत न्यायाधिश व सेवानिवृत्त विधी अधिकारी प्रक्टीसिंग डव्होकेटेस,चार्टड अकौन्टंट, कॉस्ट अकौन्टंट, राष्ट्रीय बॅका, ग्रामीण बँका, भूविकास बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, व्यापारी बँका, नागरी सहकारी बँका, राज्य सहकारी बँका यांच्या सेवेतील व्यवस्थापक दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेले सेवानिवृत्त अधिकारी (ज्यांना सेवानिवृत्त होऊन दोन वर्षापेक्षा कमी कालावधी झालेला आहे) सहकार विभागातील उपनिबंधक दर्जापेक्षा वरच्या दर्जाचे सेवानिवृत्त अधिकारी (ज्यांना सेवानिवृत्त होऊन दोन वर्षापेक्षा कमी कालावधी झालेला आहे) अशा व्यक्तींची नियुक्ती करताना अधिनियमामध्ये नमूद नसले तरीही खालील प्रमाणे अहर्ता पात्रता असाव्यात.

त्यांच्यावर कोणत्याही स्वरुपाचे गुन्हे दाखल नासावेत, शासकीस बॅक सेवेतील सेवानिवृत्त अधिकारी यांची कोणत्याही प्रकारची खातेनिहाय चौकशी चालू नसावी व सेवेत कोणताही ठपका ठेवलेला नसावा. अशी व्यक्ती कोणत्याही काळया यादीत (इळरलज्ञ ङळीीं) मध्ये समाविष्ठ नसावी. सदर व्यक्ती संबधीत विभागाच्या विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था कार्यालयाच्या अधिपत्याखाली येणा-या जिल्हयातील रहिवासी असावा (लातूर, उस्मानाबाद, बीड, नांदेड जिल्हयातील) व्यक्ती एकावेळी एकाच विभागातून अर्ज दाखल करू शकतो.

अर्जाचे विहित नमूने विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, लातूर यांच्या कार्यालयात दि. १७ डिसेंबर २०२४ ते १६ जोनवारी २०३५ या कालावधीत कार्यालयीन वेळेत मिळू शकतील, अर्ज सादर कण्याची अंतीम मुदत दि. १६ जानेवारी २०२५ पर्यंत आहे. प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी पूर्ण करुन दि. १४ फेब्रुवारी २०२५ रोजी प्रारुप लवाद नामतालिका प्रसिध्द होईल.ही प्रारुप नामतालिका यादी संबधित विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था यांच्या कार्यालयात लावण्यात येईल. प्रारुप नामीकेवर हरकती असल्यास ींरळवहरपळज्ञ८सारळश्र.लो या ईमेल आयडीवर पुराव्यासह हरकती दि. २१ फेब्रुवारी २०२५ पर्यंत सादर कराव्यात. हरकती निर्णय दि. ११ मार्च २०२५ रोजी करुन दि. १८ मार्च २०२५ रोजी अंतीम लवाद नामतालिका प्रसिध्द करण्यात येईल.याबाबतची जाहिर सूचना

# ऐतिहासिक सामाजिक आणि अध्यात्मिक महाअमृत कुंभ मेळाव्यात सहभागी व्हावे- महामंडलेश्वर स्वामी त्रिवेंद्रानंद सरस्वतीजी

बीड ।प्रतिनिधी
ऐतिहासिक सामाजिक अध्यात्मिकदृष्ट्या सुप्रसिद्ध असलेल्या अमृत कुंभमेळा भाविकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन श्री पंचायती महानिर्वानी आखाडा व श्री १००८ महामंडलेश्वर स्वामी त्रिवेंद्रानंद सरस्वतीजी महाराज, श्रीक्षेत्र इंदुवासिनीदेवी, गणेशानंदगड, पिंपळनेर यांनी केले आहे.यासंदर्भात श्री १००८ महामंडलेश्वर स्वामी त्रिवेंद्रानंद सरस्वतीची महाराज यांनी म्हटले आहे की, सन २०२४-२५ या वर्षांमध्ये दि. ६ डिसेंबर रोजी महाकुंभ छावणी भूमिपूजन करण्यात आले आहे. तर रविवार दिनांक २२ डिसेंबर २०२४ महाकुंभ धर्मध्वज स्थापना विधी करण्यात येणार आहे. यावर्षी प्रथम शाहीस्नान पौष वद्य १ मकर संक्रांती, मंगळवार दि. १४ जानेवारी २०२५, द्वितीय शाहीस्नान पौष वद्य १५, मौनी अमावस्या, दि. २९ जानेवारी २०२५, तर तृतीय शाहीस्नान माघ शुद्ध ५, सोमवार दि. ३ फेब्रुवारी २०२५ रोजी होणार आहे.



महा अमृतकुंभ मेळाव्यात ऋषीमुनी, संन्याशी, बैरागी, वैष्णव, संत- साधु, साधक सज्जन व भाविकभक्तांनी या महान पर्वाचा लाभ घ्यावा. अनंत जन्मातील दोषाचे प्रायचित्त करावे. सुख- समाधान, शांतीसाठी आपल्या न्याती, बांधवांना पुण्यफल प्रदान करण्याकरता या कुंभमेळ्यामध्ये महापर्वणीच्या वेळेला सहभागी होऊन अभूतपूर्व सोहळ्याचा आनंद घ्यावा.

त्रिवेणी संगम प्रयाग्रज धारागंज श्री पंचायती महानिर्वाणी आखाडा छावणी परमपूज्य श्री १००८ महामंडळ स्वामी त्रिवेंद्र आनंद सरस्वतीजी महाराज यांची छावणी ही कुंभमेळ्याचे ठिकाण असून भाविकांनी लाभ घेण्याचे आवाहन श्री १००८ महामंडलेश्वर स्वामी त्रिवेंद्रानंद सरस्वतीजी महाराज यांनी केले आहे.

# बीड, परभणीच्या घटना गंभीर; सरकारची सविस्तर चर्चेची तयारी

संविधानाचा अपमान सहन केला जाणार नाही - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

नागपूर ।प्रतिनिधी
बीड, परभणी येथील घडलेल्या दोन्ही घटना गंभीर आहेत. या घटनांसंदर्भात सविस्तर चर्चा करण्याची सरकारची तयारी असून संविधानाचा अपमान सहन केला जाणार नाही, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत सांगितले. मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानानुसार अपेक्षित चर्चा सभागृहात झाली पाहिजे. संविधानाचा अपमान करणारा व्यक्ती मनोरुग्ण होता. विरोधी पक्षाने राजकारण न करता अशा घटना घडू नयेत यासाठी चांगल्या सूचना मांडाव्यात, अशी अपेक्षा देखील मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली.

विधानसभा सदस्य नाना पटोले यांनी यासंदर्भात मुद्दा उपस्थित केला होता. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी स्थगन प्रस्तावादरम्यान सविस्तर चर्चा करण्यात येईल, असे सांगितले.

# शहागड .गोरी.गंधारी.वाळकेश्वर शहरासह परिसरात खुलेआम वाळू विक्री

## महसूल विभागाचे अर्थपूर्ण व्यवहारातून सोयीस्कर दुर्लक्ष ?

शहागड ।प्रतिनिधी
तालुक्यातील शहागड.गोरी.गंधारी . वाळकेश्र्वर ह्या गावात खुलेआम अवैद्य वाळू विक्रीचा गोरख धंदा वाळू माफियांनी चालवला असल्याचे दिसून येत आहे. या वाळू माफियांना महसूल विभागाचे अभय मिळत असल्याची चर्चा नागरिकांतून होत आहे. यावर जिल्हा वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कार्यवाही करावी अशी मागणी नागरिकांतून जोर धरत आहे.

रात्रंदिवस अवैध्य वाळू उपसा वाळू माफिया करत आहेत. ट्रॅक्टरच्या किनीच्या साह्याने उत्खनन करून टिप्परद्वारे शहराचा परिसरामध्ये मुख्य रस्त्यावरून खुल्या वाहतूक केली जात आहे. यासह अंबड तालुक्यातील वाळू घाटावरून अवैधरीत्याा वाळूचे उत्खनन करून चढ्या दराने मोठ्या शहरांमध्ये दिवस रात्र वाळू विक्री केली जात आहे. याकडे महसूल विभागाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे. शहरांमध्ये खुलेआम वाळू टिप्पर भरून जातात परंतु यावर महसूल व पोलिस विभागासह अन्य कुठलाही विभाग कार्यवाही करत नाही. सुसाट वेगाने टिप्पर चालक वाहने चालवतात वाळू माफिया सांगतात की, आम्हाला कोणाची भीती नाही आम्ही सर्व देऊन घेऊन करतोत त्यामुळे आमचे कोणी काय वाकडे करू शकत नाही. अशी चर्चा देखील वाळूमाफियाची ऐकायला मिळत आहे.




शहागड शहरासह परिसरामध्ये वाळू माफिया कडून महसूल मधील काही कर्मचारी हाताशी धरून वाळू विक्रीचा गोरख धंदा राजरोसपणे चालू आहे. यामुळे शासनाचा कोट्यावधीचा महसूल बुडत आहे. या सर्व बाबीकडे जिल्हा वरिष्ठ अधिकारी यांनी लक्ष देण्याची मागणी पर्यावरण प्रेमीतून होत आहे.

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# स्व.गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा योजना

## बीड तालुक्यात ३८ शेतकऱ्यांना मिळाला लाभ - तहसीलदार शेळके

बीड ।प्रतिनिधी

बीड तालुक्यात स्व. गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा योजनेअंतर्गत ३८ शेतकऱ्यांना मिळाला लाभ मिळाल्याची माहिती बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी दिली. शेतकरी अपघात विमा योजनेंतर्गत राज्यात शेती व्यवसाय करताना वीज पडणे, सर्पदंश, विंचूदंश, विजेचा शॉक, पाण्यामध्ये बुडून मृत्यू , रस्ता- रेल्वे अपघात, इत्यादी कारणामुळे आपघातील शेतकऱ्यांना लाभ दिला जातो. अपघातग्रस्त शेतकऱ्यांना अपघाती मृत्यू झाल्यास २ लक्ष व अपंगत्व आल्यास १ लाख रुपये लाभ दिला जातो. सदर योजनेत १० ते ७५ वर्षाची अट असुन महसूल नोंदीनुसार खातेदार असलेला शेतकरी व वहितीधारक खातेदार म्हणून नोंद नसलेला कोणताही एक सदस्य (आई- वडील, शेतकऱ्याची पती- पत्नी, मुलगा व अविवाहित मुलगी यापैकी कोणताही एक व्यक्ती ) असे एकूण २ जणांना या योजनेचा लाभ देता येतो. अपघातग्रस्त व्यक्तीचा परिपूर्ण कागदपत्रासह प्रस्ताव ३० दिवसाच्या आत तालुका कृषी अधिकारी यांच्याकडे सादर करावा लागतो. अधिक माहिती करिता कृषी विभागाच्या सर्व क्षेत्रीय अधिकारी, कर्मचारी कृषी पर्यवेक्षक, कृषि सहाय्यक यांच्याशी संपर्क केल्यास ते कुटुंबाच्या वारसदाराला मार्गदर्शन करतील, असे आवाहन बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके, तालुका कृषी अधिकारी अशोक साळी यांनी केले आहे .

प्रशिक्षणासाठी गेलेल्या जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या पाठ पुराव्यामुळे निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी वेळोवेळी आढावा घेतल्यामुळे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, तत्कालीन तहसीलदार तसेच तालुका कृषी अधिकारी यांनी वेळोवेळी प्रस्ताव सादर केल्यामुळे व त्यावर निर्णय घेतल्यामुळे सन २०२३-२४ या कालावधीत ५१ प्रस्तावापैकी ३८ प्रकरणे मंजूर झालेली असल्याचे तालुका कृषी अधिकारी, बीड ए.व्ही. साळी व सदर कामकाज पाहणाऱ्या सीमा अस्वले यांनी सांगितले.

सन २०२४-२५ मध्ये १४ प्रकरणे प्राप्त असून ८ प्रकरणे मंजूर केलेली आहेत. उर्वरित ६ प्रकरणात लवकरच त्रुटी पूर्तता करण्यात येतील. सदर योजनेचा अपघातग्रस्त शेतक- यांच्या वारसाने स्व.गोपीनाथराव मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा अनुदान योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव, अशोक साळी, तालुका कृषि अधिकारी यांनी तालुक्यातील शेतक-




यांना केलेले आहे .

या योजनेंतर्गत २०२३ साली पुढीलप्रमाणे मयताचे वारस अथवा अपंगत्व आलेले लाभार्थी आहेत. अशोक नवनाथ दराडे, बोरफडी, मोटार सायकल अपघातात मृत्यू ; सुरेखा गोरख काळे, लिंबारुई, मळणीयंत्रामध्ये मृत्यू ; लक्ष्मण किसन इंगळे, वंजारवाडी, मोटार सायकल अपघात मृत्यू ; नवनाथ विश्वनाथ शिंदे, चंपावती नगर, रस्ता अपघातात मृत्यू ; श्रीराम गिरजाप्पा रांजवन , आहेरवडगाव , विजेचा शॉक लागून मृत्यू ; नितीन सोनाजी भोकरे , लिंबारुई , विजेचा शॉक लागून मृत्यू , बबन पाराजी जाधव, वांगी, रस्ता अपघातात मृत्यू ; किशोर बजरंग जमदाडे , पाली, रस्ता अपघातात मृत्यू , मोतीराम तुकाराम खांडे, म्हाळसजवळा , वाहन अपघातात मृत्यू ; राहुल राजेश वाजे, ईट, रस्ता अपघातात मृत्यू ; साधना नवनाथ आगे, उखंडा, विजेचा शॉक लागून मृत्यू ; आत्माराम निवृत्ती राऊत, पाली, वीज पडून मृत्यू ; सुसेन संजय वाळेकर, कदमवाडी, रस्ते मोटार अपघातात मृत्यू ; लालचंद रामभाऊ वरपे, चाकरवाडी, रस्ता अपघातात मृत्यू ; रामहरी अशोक झनझन, साखरे बोरगाव, विजेचा शॉक लागुन मृत्यू ; धनंजय गोविंदराव मोरे , रौळसगाव , रस्ता अपघातात मृत्यू ; सजन संदीपान सानप, शिवनी, रस्ता अपघात अपगंत्व; जनार्धन अबाधस इंदुरे , सौंदाना , रस्ता अपघातात मृत्यू ; अंबादास हनुमंत डोईफोडे , डोईफोडवाडी, विजेचा शॉक लागून मृत्यू ; आप्पासाहेब मस्के , राक्षसभुवन , स्फोटात मृत्यु ; सुपनोर रोहीनी बाबुराव , हिवरापहाडी , विहीरीत पडुन मृत्यू ; अजीनाथ राजेभाऊ आमटे, खांडेपारगाव , रस्ता अपघातात मृत्यु ; गणपत मुकण पवार, काळेगाव हवेली , अपघातात मृत्यू ; नाना रामसखा जोगदंड, वाणगाव, रस्ता अपघातात मृत्यू ; भगवान पाडुरंग खांडेकर, पाली, रस्ता अपघातात मृत्यू ; सखाराम प्रल्हाद घरत , महाजनवाडी , रस्ता अपघात मृत्यू ; विजय सखाराम पवार, गुंधा वडगाव, पेट्रोलचा भडका झाल्याने मृत्यू ; पदमाकर बाबासाहेब सिंघम, इमामपूर,

रस्ता अपघात मृत्यू ; दिनकर भाऊसाहेब काशीद , साक्षाळ पिंप्री, बैल गाडीवरील अपघातात मृत्यू; शिवाजी बाबासाहेब शिंदे , पिंपळनेर , रस्ता अपघातात मृत्यू ; सुमित बाळासाहेब जोशी , कुर्ला, रस्ता अपघातात मृत्यू ; अशोक बन्सीधर शिंदे, पालवन , विजेचा शॉक लागून मृत्यू ; नारायण श्रीकिसन गिराम, नाथापूर, वाहन अपघातात मृत्यू ; अशोक रंगनाथ शिंदे, परभणी केसापुरी , विजेचा शॉक लागुन मृत्यू ; राहीबाई जालिंदर नवले, पाली, रस्ता अपघातात मृत्यू ; पंचफुला लक्ष्मण बहीर, बेलूरा, विजेच्या धक्याने मृत्यू ; सीताराम शहादेव हातवटे , खंडूरस, इलेक्ट्रिक शॉकने मृत्यू ; केशव दादाराव बाबर, नबाबपूर , रस्ता अपघातात मृत्यू ; लता राजेंद्र भालेराव, पारगाव सिरस, रस्ता अपघातात मृत्यू ; जयसिंग चंद्रभान अवचर, वडवाडी, रस्ता अपघातात मृत्यू ; रामहरी महादेव झांझुर्णे , वंजारवाडी, रस्ता अपघातात मृत्यू तर बापुराव ऊर्फ अनिरुध्द श्रीराम मुंडे, ताडसोन्ना रस्ता अपघातात अपंगत्व आलेले आहे . २०२४ सालची मंजूर प्रकरणे पुढीलप्रमाणे आहेत:निवृत्ती कल्याण शिंदे, हिवरापहाडी, रस्ता अपघातात अपंगत्व; सुनिल भीमा धेंडुळे, हिवरापहाडी, रस्ता अपघातात मुत्यु ; युवराज महादेव बहिरवाळ, मंझरी हवेली विजेचा धक्का लागून मुत्यु ; महादेव शामराव कदम, इमामपूर, अनिता नारायण सुपेकर साक्षाळपिंपरी, पांडुरंग मुलीधर सावंत, सावंतवाडी, वाहन अपघातात मृत्यू ; कांताबाई खडू शिंदे, कांबी रस्ता अपघातात मृत्यू ; समाधान बाळू थोरात, सावरगाव घाट, रस्ता अपघातात, मृत्यू झालेला आहे.

---

## भारतीय संविधानाच्या प्रतीकृतीची विटंबना करणाऱ्या समाज कंटकावर देशद्रोही

## कायद्यानुसार कठोर कारवाई करावी

माजलगाव ।प्रतिनिधी

परभणी येथे १० डिसेंबर २०२४ रोजी देशद्रोही समाज कंटकाने भारतीय संविधानाच्या प्रतीकृतीची विटंबना केली आहे.या देशद्रोही कृत्याचा दि बुध्दिस्ट सोसायटी ऑफ इंडियाच्या वतीने जाहीर निषेध करण्यात येत आहे.भारतीय संविधानाच्या प्रतीकृतीची विटंबना करणाऱ्या देशद्रोही समाज कंटकावर भारतीय संहितेच्या देशद्रोही कायद्या नुसार कठोर कारवाई करावी. आणि सीबीआय चौकशी करून यातील मास्टर माईंड चा शोध घेण्यात यावा.तसेच सोमनाथ सूर्यवंशी या आंबेडकर वाद्याचा मृत्यू झाला आहे.तो पीसीआर मध्ये होता. तेव्हा अमानवी अत्याचार करणाऱ्या पोलिसांवर तातडीने कारवाई करावी.तसेच याप्रकरणी परभणी जिल्ह्याचे पोलिस अधिकारी व प्रशासनाला जाग यावी यासाठी संविधानिक मार्गाने आंदोलन करणाऱ्या निरपराध नागरिकांना व्देष भावनेतून अमानुष मारहाण केली आहे.त्यांच्यावर देखील कठोर कारवाई करावी.तसेच बौद्ध समाजावर व्देष भावनेतून केले जात असलेले कोंबिग ऑपरेशन त्वरित थांबवावे.निर्दोष स्त्रीया, तरुणांवर दाखल केलेले गुन्हे तात्काळ मागे घेऊन त्यांना मुक्त करावे.सदर देशद्रोही समाज कंटकावर योग्य ती कठोर कारवाई



न झाल्यास जिल्ह्यातील संपूर्ण बौद्ध समाज रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करेल.

यातून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी प्रशासनाची राहिल.अशा अशयाचे भारतीय बौद्ध महासभा ता. माजलगावच्या वतीने निवेदन देऊन निषेध व्यक्त केला. यावेळी भारतीय बौद्ध महासभेचे तालुका अध्यक्ष डॉ. भागवत साळवे,जिल्हा पर्यटन सचिव शामभाऊ वाघमारे, शहर अध्यक्ष एल.आर.मस्के, सरचिटणीस सिद्धार्थ वक्ते,ता. संरक्षण उपाध्यक्ष नितिन डोंगरे,संरक्षण सचिव दयानंद साळवे,फुले पिंपळगावचे माजी सरपंच अभिमन्यु साळवे,बहुजन समाज पार्टी चे ॲड.अमोल डोंगरे,लिलाताई उजगरे,कालींदाताई बनसोडे, बाबासाहेब सोळंके,मोहन काकडे,दत्ता प्रधान,सटवा मस्के सह भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी उपस्थित होते.

---

## संविधान प्रेमी निरपराध सोमनाथ सुर्यवंशी यांच्या मृत्युची सिआयडी मार्फत चौकशी करा

### समस्त शिव फुले शाहु आंबेडकर अनुयायींची मागणी सर्व पक्षीय संघटनेची माजलगाव बंदची हाक शांततेत

माजलगाव ।प्रतिनिधी

परभणी शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या समोरील संविधान शिल्पाची जातीयद्वेष पसरविण्याचा उद्देश समोर ठेवून तोडफोड केली.त्याचा परिणाम परभणी शहरातील संविधान प्रेमी यूवक आक्रमक झाल्याने कांही युवकांना न्यायालयीन कोठडीत ठेवण्यात आले होते.त्यातच सोमनाथ सुर्यवंशी या युवकाचा कारागृहात मृत्यु झाल्याची धक्कादायक घटना घडली असुन या घटनेचा निषेध व्यक्त करत दि.१६ डिसेंबर रोजी अवघा महाराष्ट्र बंद ची हाक डॉ.बाबासाहेब आंबेडकर अनुयायांनी दिली आहे.तरी माजलगाव तालुक्यातील सर्व समाज बांधवांनी शांततेचे सहकार्य करावे,असे आवाहन शिव शाहु फुले आंबेडकर अनुयायी माजलगाव यांच्या वतीने करण्यात आले होते.

परभणी येथील न्यायालयीन कोठडीत असलेल्या तरुणाचा कारागृहात मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे.मृत तरुणाचे नाव सोमनाथ सूर्यवंशी,वय ३५ वर्ष असे असून त्याला



जिल्हा सामान्य रुग्णालयात नेल्यानंतर डॉक्टरांनी मृत घोषित केले.या प्रकारामुळे परभणी शहरात पुन्हा तणावाचे वातावरण निर्माण झाले असून घटनेची गंभीर दखल घेत नांदेड परिक्षेत्राचे आयजी शहाजी उमाप पुन्हा परभणीत दाखल झाले आहेत. सोमनाथ सूर्यवंशीचा मृत्यू नेमका कशामुळे झाला याबाबत सध्या काहीही स्पष्ट नाही.या तरुणाचे न्यायाधीशांच्या उपस्थितीत शवविच्छेदन करण्यात येणार आहे.शवविच्छेदन अहवालानंतर मृत्यूमागील नेमके कारण स्पष्ट होईल,असे सूत्रांकडून सांगण्यात आले आहे.

परभणी शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोरील संविधान शिल्पाची तोडफोड झाल्यानंतर पुकारण्यात आलेल्या बंद आंदोलनाला हिंसक वळण लागले होते. आंदोलकांचा मोठा जमाव, दगडफेक,जाळपोळ, पोलिसांचा आंदोलकांवर लाठीचार्ज,जमावबंदी,इंटरनेट सेवा बंद अशा घटनांनंतर जवळपास ५० जणांना ताब्यात घेण्यात आले होते.या प्रकरणी न्यायालयीन कोठडीत असलेल्या एकाचा कारागृहातच मृत्यू झाल्याची बातमी समोर आली आहे. सोमनाथ सुर्यवंशी,असे त्या ३५ वर्षीय मृत तरुणाचे नाव आहे.कारागृहातच या तरुणाचा मृत्यू झाल्याने शहरात पुन्हा अस्वस्थता व तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.

परभणीत झालेल्या दगडफेक प्रकरणी न्यायालयीन कोठडीत असलेल्या एका तरुणाचा कारागहातच मृत्यू झाला आहे. प्राथमिक माहितीनुसार, सोमनाथ सुर्यवंशी असे ३५ वर्षीय मयत तरुणाचे नाव असून जिल्हा सामान्य रुग्णालयात आणल्यानंतर डॉक्टरांनी त्या तरुणास मृत घोषित केले.या घटनेने परभणीत पुन्हा एकदा तणावाचं वातावरण निर्माण झालंय.याच अनुषंगाने माजलगाव बंदची हाक आंबेडकरी जनतेच्या वतीने देण्यात आली होती.या आशयाचे निवेदन पोलीस प्रशासनाला समस्त शिव फूले शाहु आंबेडकरी अनुयायी व कार्यकर्त्यांनी माजलगाव शहर पोलीस स्टेशनला दिले होते. या बंदमध्ये सर्वपक्षीय सर्व संघटना सहभागी झाले होते. हा बंद शांततेत पाळण्यात आला व सर्व व्यापारी बांधवांनी या बंदला सहकार्य केले.यावेळी सर्व तमाम आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्ते नेते मोठ्या प्रमाणात हजर होते.

---

## मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेचा कार्यकाळ ११ महिने वाढवा

### अंबड तालुक्यातील प्रशिक्षणार्थींची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

अंबड ।प्रतिनिधी

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेमध्ये युवा प्रशिक्षणार्थींना शासकीय कामकाज करण्याचे प्रशिक्षण मिळत आहे.त्याचप्रमाणे या काळात मानधन सुध्दा मिळत असल्याने ही शासनाची एक सर्वोत्कृष्ट संकल्पना आहे.या योजनेचा लाभ आमच्या सारख्या सुशिक्षित बेरोजगार तरुण- तरुणींना बेरोजगारी हटविण्यासाठी होत असल्यामुळे या योजनेचा कार्यकाळ ११ महिने वाढवा अशी मागणी अंबड तालुक्यातील प्रशिक्षणार्थींनी मुख्यमंत्र्यांकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.



तहसीलदार विजय चव्हाण यांच्या मार्फत आज (ता.१६) सोमवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिलेल्या निवेदनात अंबड तालुक्यातील प्रशिक्षणार्थींनी म्हटले आहे की,महाराष्ट्र शासन युवा कार्यप्रशिक्षण योजना ही राज्य पातळीवर मोठ्या प्रमाणात सुरु आहे या योजनेचा लाभ आमच्या सारख्या सुशिक्षित बेरोजगार तरुण- तरुणींना बेरोजगारी तसेच आमच्यावर निर्भर कुटुंबाचा उदरनिर्वाहाचा प्रश्न मिटवण्यासाठी हातभार म्हणून होईल. त्यामुळे युवा कार्यप्रशिक्षण योजनेचा प्रशिक्षण कालावधी पूर्ण झाल्यानंतर ११ महिने कालावधी वाढवून देण्यात यावा अशी कळकळीची विनंती सर्व प्रशिक्षणार्थी यांनी निवेदनात केली असून आमच्या या निवेदनाला मानविय दृष्टीकोनातून स्विकारावे असेही म्हटले आहे.

या निवेदनावर अंबड तालुक्यातील प्रशिक्षणार्थी पांडूरंग मुसळे,अमोल कोरडे,आकाश गाढवे, आकाश खरात, ज्योती बोंबले,अश्विनी खरात,पुनम आष्टेकर,प्राजक्ता देशमुख,वर्षा थेटे,मनिषा तांबडे,वैष्णवी चव्हाण,शितल शिंदे,उषा कोळेकर, महेक शेख,पूजा भालके,वृषाली कनके,सोनाली राक्षे,अर्चना मुळे,सारिका मस्के,लहू शेळके,विठ्ठल डोखळे,गणेश सावंत, संकेत वाघ, मिलिंद पारदे, कैलास परमेश्वर,रविंद्र जोरले,महेश साठे,किशोर डोईफोडे,कुंडलिक आव्हाड,अनिल पारदे,सचिन कामठे,सोहेल पठाण,आबासाहेब पवार,उद्धव काळवणे,कपिल मुंजाळ, दत्ता केजभट,रामेश्वर ढापसे आदींची नावे आहेत.



## सावता परिषदेचा ऋणानुबंध कायम राहिल - ना.पंकजाताई मुंडे

नागपूर - भारतीय जनता पार्टीच्या नेत्या नामदार पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांची राज्याच्या मंत्रिमंडळामध्ये कॅबिनेट मंत्री म्हणून वर्णी लागल्याबद्दल नागपूर येथे सावता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेस ओबीसी विभागाचे प्रदेशाध्यक्ष कल्याणराव आखाडे यांनी त्यांचा संतशिरोमणी सावता महाराजांची मुर्ती व पगडी देऊन सन्मान केला.यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस ओबीसी विभागाचे प्रदेश सरचिटणीस संतोष राजगुरू, प्रदेश संघटक प्रविण मांडे, भाजपचे युवा नेते बालाजीराव पवार, युवा नेते संतोष कंठाळे, सावता परिषदेचे आष्टी तालुकाध्यक्ष बाबा वाघुले आदीजन सोबत होते.

---




## सावता परिषदेचा मी ऋणी आहे - धनंजय मुंडे

नागपूर - बीड जिल्ह्याची शान, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे फायरब्रँड नेते ना.श्री.धनंजयराव मुंडे यांनी राज्याच्या कॅबिनेट मंत्री म्हणून शपथ घेतल्यानंतर नागपूर येथील त्यांच्या शासकीय बंगल्यावर सावता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेस ओबीसी विभागाचे प्रदेशाध्यक्ष कल्याणराव आखाडे यांनी संतशिरोमणी सावता महाराज यांची मूर्ती,पगडी तसेच शेला देऊन त्यांचे अभिनंदन केले.शुभेच्छा व्यक्त केल्या.यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस ओबीसी विभागाचे प्रदेश संघटक श्री.प्रविण मांडे, बीड जिल्हाध्यक्ष श्री.विजय धायगुडे, श्री.संतोष कंठाळे सोबत होते.

## शहीद भीमसैनिक सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबाचें पुनर्वसन करा - विष्णूबाळ झोडगे

बीड ।प्रतिनिधी

परभणी येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळील संविधानामधील प्रस्तावनेतीच्या प्रतीकृतीची विटंबना करणा-या समाजकंटकाच्या निषेधार्थ राज्यात तसेच देशभरात सनदशीर मार्गाने आंदोलने सुरु असताना. परभणी येथील आंदोलकांना स्थानिक पोलीसांच्याकडून निर्दयपणे बेदम मारहाण करुन त्यांना अटक करण्यात आली आहे.शिवाय बंद घरे,घरासमोर पार्किंग केलेली वहाने पोलीस कर्मचारीच फोडीत असल्याच्या बातम्या प्रसिद्ध झालेल्या आहेत.याचा आम्ही निषेध करीत आहोत. याच आंदोलनातील भिमसैनिक सोमनाथ सुर्यवंशी या ङङइ च्या विद्यार्थ्यांस पोलीसांनी निर्दयपणे बेदम मारहाण



करुन अटक केली. न्यायालयीन कोठडीत असताना त्यांचा दुर्दैवी मृत्यु झाला. या मृत्यूस पोलीसच जबाबदार असुन अशा पोलासांचा शोध घेऊन त्यांचेवर सेवेतून बडतर्फीची कारवाई करावी. सोमनाथ सुर्यवंशी यांच्या कुटूंबीयातील सदस्यास शासकीय नोकरीत सामावून घेऊन पुनर्वसन करण्याची मागणी आंबेडकरी जनतेने केली आहे.तसेच त्यांच्या कुटूंबीयांना भरीव आर्थिक मदत करावी.या प्रकरणाची उच्च स्तरीय चौकशी करुन या मागील कटाचा मुख्य सूत्रधार कोण आहेत त्यांचेवर कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी आंबेडकरी जनता आणि सामजिक कार्यकर्ते तथा समदिप सामाजिक प्रतिष्ठान बीड यांच्या वतीने विष्णूबाळ झोडगे यांनी केली आहे.

## माजी राज्यपाल एस. एम. कृष्णा,दिनकरराव जाधव यांना विधानपरिषदेत श्रद्धांजली

नागपूर ।प्रतिनिधी

महाराष्ट्राचे माजी राज्यपाल दिवंगत एस. एम. कृष्णा आणि विधानपरिषदेचे दिवंगत सदस्य दिनकरराव भाऊसाहेब जाधव यांना विधानपरिषदेत श्रद्धांजली वाहण्यात आली. विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी माजी राज्यपाल एस. एम. कृष्णा, माजी विधानपरिषद सदस्य दिनकरराव जाधव यांच्या दुःखद निधनाबद्दल शोक प्रस्ताव मांडला.